अनुसूचित जमातीची लोकसंख्या प्रामुख्याने जास्त असलेल्या ठाणे, नाशिक, धुळे, यवतमाळ, रायगड, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांसाठी वर्ग-3 व वर्ग-4 साठी सेवेत अनुसूचित जमातीसाठी वाढीव आरक्षण ठेवण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन निर्णय क्रमांक:बीसीसी-1098/प्र.क्र.116/98/16-ब,

मंत्रालय, मुंबई 400 032. दिनांक 22 सप्टेंबर 1999.

**वाचा :-** 1) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-1093/2167/सीआर-141/93/16-ब, दिनांक 18 जून 1994.

2) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-1093/2167/सीआर-141/93/16-ब, दिनांक 1 सप्टेंबर 1997.

**शासन निर्णय :-** उपरोक्त दिनांक 18 जून 1994 च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीची लोकसंख्या तुलनेने अधिक असलेल्या सात जिल्ह्यांमध्ये गट-क आणि गट-ड मध्ये सरळसेवा पदाच्या भरतीसाठी अनुसूचित जमातीकरिता असलेले वाढीव आरक्षण या पुढेही तसेच चालू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

2. महसूल व वन विभागाच्या क्रमांक पीईएन-3197/सीआर-74/एम-10, दिनांक 30 जून 1998 च्या अधिसूचनेद्वारे धुळे जिल्ह्याचे विभाजन करुन धुळे व नंदुरबार असे 2 जिल्हे निर्माण करण्यात आले आहेत. धुळे जिल्ह्यामध्ये अनुसूचित जमातीकरिता शासकीय सेवेतील गट-क आणि गट-ड मधील सरळसेवा भरतीसाठी 22 टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे. त्यामुळे नवनिर्मित नंदुरबार जिल्ह्यासाठी देखील शासकीय सेवेत गट-क आणि गट-ड मधील सरळसेवा भरतीच्या पदांसाठी अनुसूचित जमातीकरिता 22 टक्के आरक्षण लागू करण्यात येत आहे. यासाठी उपरोक्त दिनांक 1 सप्टेंबर 1997 च्या शासन निर्णयाप्रमाणे तसेच धुळे जिल्ह्यासाठी असलेल्या बिंदूनामावली प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

शैला तारगे पाटील,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव,
उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

(कृ.मा.प.

एच-740(5000-10-99)

* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

सचिव, सर्व प्रादेशिक निवड मंडळे,
सचिव, राज्य निवड मंडळ,
संचालक, समाजकल्याण पुणे,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
महालेखापाल, महाराष्ट्र 1/2 (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र 1/2 (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

---

एच-740(5000-10-99)-अ.